**वादीतर्फे सा.क्र.१ चा सरतपास वादीतर्फे विधीज्ञ श्री. देशमुख यांच्यामार्फत शपथेवर सुरू-:-**

१. माझे शपथपत्र नि.क्र. ४३ मधील संपुर्ण मजकूर माझ्या माहितीप्रमाणे खरा व बरोबर आहे व तो वाचून मी त्यावर स्वाक्षरी केली आहे.

२. मी शपथपत्रासह खालील कागदपत्रे दाखल केलेले आहेत.

1) गट क्र. २६९/४/१/१ च्या ७/१२ ची प्रमाणित प्रत **नि.क्र. ४५**
2) गट क्र. २६९/४/१/२ च्या ७/१२ ची प्रमाणित प्रत **नि.क्र. ४६**
3) गट क्र. २६९/२/१ च्या ७/१२ ची प्रमाणित प्रत **नि.क्र. ४७**
4) गट क्र. २६९/२/२ च्या ७/१२ ची प्रमाणित प्रत **नि.क्र. ४८**
5) गट क्र. २६९/३ च्या ७/१२ ची प्रमाणित प्रत **नि.क्र. ४९**
6) गट क्र. २६९/४/२ च्या ७/१२ ची प्रमाणित प्रत **नि.क्र. ५०**

सरतपास पुर्ण.

**उलटतपास प्रतिवादी क्र. १२ व १३ तर्फे विधीज्ञ श्री. एस. डी. खपके यांच्यामार्फत :-**

३. गट क्र. २६९ हा एकुण २० एकर २१ गुंठ्याचा आहे. त्यात एकुण १६ खातेदार आहे. मी प्रस्तुतचा दावा हा अतिक्रमण काढून घेण्यासाठी दाखल केला आहे.

प्रश्न - गट क्र. २६९ मधुन कोंडवड-शिलेगाव चौफला ते शिलेगाव बिरोबा चौफुला असा अंदाजे ३० ते ३५ गुंठे मधुन गेला आहे ?

उत्तर - सदर रस्ता २१ गुंठ्यामधुन गेला आहे.

प्रश्न - गट क्र. २६९ मधुन मुळा धरणाची चारी अंदाजे ३० ते ३५ गुंठे मधुन गेली आहे ?

उत्तर - सदर चारी २० गुंठ्यामधुन गेली आहे.

रस्त्याचे व चारीचे क्षेत्र ७/१२ तुन वजा झालेले नाही. गट क्र. २६९ मध्ये ब-याच वस्त्या आहेत. तसेच विहीरी व बोअरवेल आहेत. मोजणीच्या वेळेस मी हजर होतो.

मोजणीदार १२ वाजता आले व ४ वाजेपर्यंत मोजणी चालू होती. मोजणीदारासोबत त्यांचा एक मदतनीस होते. प्रतिवादी क्र. १२ व १३ हे माझ्या शेताच्या बांधालगतचे शेजारी नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादग्रस्त मिळकतीची कधीही मोजणी झाली नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. १२ व १३ यांनी अतिक्रमण केल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे शपथपत्र दाखल करून आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**प्रतिवादी क्र. १ ते ११ गैरहजर. तसेच त्यांचे विधीज्ञही गैरहजर. करिता उलटतपास नाही.**

**प्रतिवादी क्र. १४ ते १६ गैरहजर. तसेच त्यांचे विधीज्ञही गैरहजर. करिता उलटतपास नाही.**

उलटतपास पुर्ण.

फेरतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्विकृत

MAYUR EKNATHRAO PAWAR

Digitally signed by MAYUR EKNATHRAO PAWAR
Date: 2026.01.08 16:24:30 +0530

(मयुर ए. पवार)

दिनांक:-०८/०१/२०२६.

दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
ता. राहुरी, जि. अहमदनगर.